NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २२.११.२०२६ रविवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २१.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १४ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण १,२८,०५०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, म.जु.का. कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून एकुण ४३,७६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

त्याचप्रमाणे, दिनांक २१.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २२.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पिडींग कलम ११२/१८३ मोवाका अन्वये २६ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४९ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ०८ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २३३ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ६० केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ५७ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १८ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ७० केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०८ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ५० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये २५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,२०२ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४ (सि) अन्वये १३ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १४ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,१८४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ४,७६,२५५/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे नविन कामठी :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०८.०८.२०२६ ते १९.११.२०२६ चे १९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, प्लॉट नं. ०३, चौधरी इस्टेट, घोरपड रोड, कामठी, नागपुर ह.मु. प्लॉट नं. ५८, जिवराज पार्क, अहमदाबाबद, गुजरात येथे राहणारे फिर्यादी नामे प्रदीपकुमार गंगा सिंह, वय ३१ वर्षे हे त्यांचे नागपूर येथील राहते घराला कुलूप लावून जॉब करीता परिवारासह अहमदाबाद, गुजरात येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात

चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून बेडरूम मधील आलमारीतील रोख ४०,०००/—रू., सोन्याचे—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण ५,३३,८९३/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. विनायक इंगळे ९२८४८८१०८३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे नविन कामठी:— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल.

दिनांक २१.११.२०२६ चे १८.१५ वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे जब्बार शेख वल्द गब्बर शेख, वय ५० वर्षे रा. रामनगर, लोहिया ले—आऊट, कन्हान, नागपूर हे पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, कळमणा कामठी रोड, इटालियन मारबल दुकानासमोरील रोडवरून त्यांचे दुचाकीने जात असता, एका पांढऱ्या सिल्व्हर रंगाची चार चाकी कार चालकाने त्याचे असे कृत्याने अपघात होवून कोणाचेही जिवाला धोका होवू शकतो असे माहित असतांनाही त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन रोडने जाणाऱ्या फिर्यादीचे वडीलांचे दुचाकीला धडक देवुन, त्यांना गंभीर जखमी करून पळून गेला. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अनमोल भिमराव बारमाटे वय ३९ वर्ष, रा. रामनगर, लोहिया ले—आऊट, कन्हान, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि विनायक इंगळे ९२८४८८१०८३ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम १०५,२८१ भा.न्या.सं, सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे तहसील :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी अरूणकुमार शिवकुमार अग्रवाल, वय ५१ वर्षे, रा. कॅनल रोड, रामदास पेठ, नागपूर यांचा हार्डवेअर व मशीनरी ट्रेडर्सचा व्यवसाय असून त्यांचे पोलीस ठाणे तहसील हद्दीत लाल इमली चौक, गांधीबाग येथे ऑफीस आहे. आरोपी १) अक्षय नंदेश्वर वय ३५ वर्षे, रा. सदर, नागपूर हा विदर्भ रिजनचा सेल्स मॅनेजर असून त्याचे विदर्भातील सर्व कृषि साहित्य व इलेक्ट्रीकल साहित्य विकणारे व्यवसायीकांसोबत चांगले संबंध होते. व तो फिर्यादीचे दुकानात ऑर्डर देण्याचे काम करीत होता. फिर्यादीचे दुकानात आरोपी क्र. २) मिथून वंजारी वय ३० वर्षे ३) मोहिस देशमुख वय ३० वर्षे हे सेल्स मॅनेजरचे काम करतात. आरोपी ४) रूहिना खान वय ३० वर्षे ५) संजना लोखंडे वय २३ वर्षे, रा. लकडगंज, नागपूर ह्या अकाऊंटंट म्हणून काम करीत होत्या. दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक २०.१०.२०२६ दरम्यान, यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे दुकानातील पाठविलेल्या मालाचे बिलांमध्ये मॅन्युप्लेट करून, बिलांमध्ये कॉन्टीटी कमी केली. तसेच, काही बिलांचे स्टेटमेन्ट्स रद्द केले. आरोपींनी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता फिर्यादीचा विश्वासघात करून फिर्यादीची एकुण २३,००,०००/—रू. ची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. संदीप भिताडे ८९७५९६९७९४ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४), ३१६(२), ३३५, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.